॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com
अहिल्यानगर | रविवार, दि. २८ जून २०२६ | वर्ष ७ वे | अंक २७ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

*** सुविचार ***
मानवी नात्यांमध्ये सर्वात मोठा शत्रू म्हणजे गैरसमज.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### अपात्रता

भ्रष्ट इथल्या व्यवस्थेचेही
मातीचेच असणार पाय
प्रत्येक गोष्ट फुटणार आहे
अभेद्य असे उरले काय?
रोज नव्या स्वप्नांची
आम्ही करत सुटलो माती
तपासणारांची पात्रता नेमकी
आहे कोणाच्या हाती

# नीटनंतर आता टीईटीचा पेपर फुटला

## रविवार होणारी परीक्षा रद्द । राज्य सरकारवर पुन्हा नामुष्की

● **मुंबई । वीरभूमी –**
देशभरात नीट परीक्षा पेपरफुटीमुळे आधीच गोंधळ सुरू असताना, आता महाराष्ट्रात शिक्षक पात्रता परीक्षा म्हणजेच टीईटीचा पेपर फुटल्याने खळबळ उडाली आहे. या नव्या प्रकरणामुळे शासकीय व्यवस्थेला मोठ्या नामुष्कीला सामोरे जावे लागले असून महायुती सरकारवर नामुष्कीची वेळ आली आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने राज्यातील १ हजार २८ केंद्रांवर रविवारी होणारी ही परीक्षा ऐनवेळी अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. सातत्याने होणाऱ्या या पेपरफुटीच्या प्रकारांमुळे राज्यभरातील परीक्षार्थी उमेदवारांमधून आणि नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. हे संपूर्ण प्रकरण भिवंडीतून समोर आले असून या प्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे, तर मुख्य आरोपी अद्याप फरार आहे.

रविवारी पहाटे मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, भिवंडी येथे काही व्यक्तींना टीईटी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेबाबत माहिती असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. त्यानुसार भिवंडी पोलिसांनी तातडीने संबंधित ठिकाणी धाड टाकून तपासणी केली. यावेळी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांना तातडीने घटनास्थळी बोलावून पडताळणी करण्यात आली. तपासादरम्यान संबंधित संशयित व्यक्तींकडे आढळलेले काही प्रश्न आणि प्रत्यक्ष शिक्षक पात्रता परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न समान असल्याचे निदर्शनास आले. या गंभीर प्रकारानंतर भिवंडी पोलिस ठाण्यात तातडीने गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी ट्रॅप लावून पेपर विकणाऱ्या तीन आरोपींना पकडले असून त्यांच्या अंगझडतीतून टीईटी



पेपरच्या चार वेगवेगळ्या कॉपी जप्त केल्या आहेत.

पकडण्यात आलेले तिन्ही आरोपी महाराष्ट्राबाहेरील असून ते दिल्लीहून आले होते. यामध्ये राजीव श्रीप्रयाग शाव, बिहारचा आकाशकुमार स्वराज कुमार आणि हरियाणाचा धीरज बलराज सिंग यांचा समावेश आहे. हा पेपर या आरोपींना कुठून मिळाला आणि त्यांनी तो इतर ठिकाणी कुठे विकला आहे, याचा तपास आता पोलिसांमार्फत केला जात आहे. काही दिवसांपूर्वीच नीटचा पेपर फुटल्याने संपूर्ण देशात खळबळ उडाली होती आणि त्यामध्ये महाराष्ट्रातील मुख्य आरोपी समोर आले होते. त्यानंतर आता पहिली ते आठवीच्या शिक्षक पदांसाठी उमेदवारांची पात्रता निश्चित करणाऱ्या या राज्यस्तरीय टीईटी परीक्षेचा पेपर फुटल्याने पुन्हा एकदा महाराष्ट्र हादरला आहे.

या पेपरफुटीचा मोठा फटका राज्यातील ६ लाख १२५ परीक्षार्थी शिक्षकांना बसला आहे. यामध्ये पेपर १ साठी २ लाख ५८ हजार ६१ तर पेपर २ साठी ३ लाख ४२ हजार ६४ उमेदवारांनी नोंदणी केली होती. या सर्व उमेदवारांनी परीक्षेची मोठी तयारी केली होती, परंतु ऐनवेळी परीक्षा रद्द झाल्याने त्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले गेले आहे. मात्र, प्रशासनाने स्पष्ट केले आहे की या परीक्षार्थींना आता नव्याने नोंदणी करण्याची गरज नाही आणि त्यांच्याकडून कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही. येत्या २ ते ३ दिवसांत टीईटी परीक्षेची नवीन तारीख घोषित केली जाईल, असे सांगण्यात आले आहे.

टीईटी परीक्षा पेपरफुटीचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठांच्या आदेशाने डीसीपी पवन बनसोड यांच्या नेतृत्वाखाली २० जणांचे एक विशेष पथक तयार करण्यात आले असून यात २ एसीपी आणि ९ पीआय, एपीआय यांचा समावेश आहे. दुसरीकडे, या घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय घेतला असून ठाण्याचे सहपोलिस आयुक्त पंजाबराव उगले यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी गठित करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपी सध्या फरार असून त्याचा शोध घेतला जात आहे. मुख्य आरोपी पकडल्यानंतरच हा पेपर कुठे-कुठे विक्री केला आहे आणि यात आणखी कोणाचा समावेश आहे, या सर्व प्रकरणाचा खरा खुलासा होईल.

## SPOT NEWS

### एका वर्षात जन्मलिंग गुणोत्तर ९१२ वरून ८९७ वर

● **मुंबई –** राज्यात 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' आणि 'पीसीपीएनडीटी' कायद्याची कडक अंमलबजावणी होत असल्याचा दावा केला जात आहे. असे असतानाच, राज्याच्या आरोग्य विभागाच्या अंतर्गत अहवालातून व नागरी नोंदणी प्रणालीच्या ताज्या आकडेवारीनुसार, राज्यात जन्मत: लिंग गुणोत्तर कमालीचे घसरले आहे. सन २०२४ मध्ये राज्यात हे प्रमाण प्रति हजार मुलांमागे ९१२ मुली इतके होते, जे सन २०२५ च्या प्राथमिक अहवालानुसार थेट ८९७ वर खाली आले आहे. एकाच वर्षात झालेली ही मोठी घसरण राज्यातील गर्भलिंग निदान करणाऱ्या बेकायदेशीर टोळ्या पुन्हा सक्रिय झाल्याचा स्पष्ट संशय मानला जात आहे.

### खरिपाच्या पेरण्या खोळंबल्या

● **अयोध्या –** बेभरवशाच्या पावसामुळे शेतशिवारावर पडलेले दुष्काळाचे सावट अधिक गडद झाले आहे. मृग नक्षत्र कोरडे गेले, पण आर्द्रा पडल्या, त्याही एक दिवसच! त्यानंतर पाऊस गायबच झाला. मराठवाड्याच्या आभाळात सध्या वांझोट्या ढगांचीच गर्दी झाली आहे. हवामान खात्याने चार दिवस चांगला पाऊस पडणार असल्याचे भाकित केले होते. परंतु आता थेट जुलैमध्येच पाऊस पडेल, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. यंदा 'एल निनो 'मुळे पर्जन्यमान कमी असल्याचा इशारा हवामान खात्याने मान्सूनच्या पहिल्या अंदाजातच इशारा दिला होता.

## महाराष्ट्रातील २०० भाविक काठमांडूमध्ये अडकले

● **मुंबई । वीरभूमी –**
महाराष्ट्रातील विविध भागांतून कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेले तब्बल २०० भाविक सध्या नेपाळची राजधानी काठमांडू येथे अडकून पडले आहेत. यात्रेसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे, परवानग्या आणि प्रक्रिया पूर्ण करूनही चीनकडून व्हिसा मंजूर न झाल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे भाविकांमध्ये चिंतेचे वातावरण असून शासनाकडे मदतीची मागणी करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, यात्रेकरूंनी वेळेत सर्व आवश्यक कागदपत्रे सादर केली होती. तसेच कैलास मानसरोवर यात्रेसाठी लागणारे परमिटही त्यांना मिळाले होते. मात्र, चिनी दूतावासाकडून अद्याप व्हिसा जारी करण्यात आलेला नाही. परिणामी महाराष्ट्रातील सुमारे २०० भाविकांना काठमांडूमध्येच थांबावे लागत आहे. यामध्ये पुणे, मुंबई आणि राज्यातील इतर भागांतील भाविकांचा समावेश आहे.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी अडकलेल्या भाविकांशी दूरध्वनीवरून संवाद साधला. भाविकांच्या अडचणी जाणून घेत त्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या स्तरावरही याबाबत पाठपुरावा सुरू असल्याची माहिती देण्यात आली. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेही भाविकांच्या नातेवाईकांनी मदतीची विनंती केली आहे. सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनही व्हिसा न मिळाल्याने यात्रेकरूंना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. परराष्ट्र मंत्रालयाने या प्रकरणाची दखल घेत बीजिंगमधील भारतीय दूतावासाशी संपर्क साधला असून चीन सरकारशी आवश्यक समन्वय सुरू आहे. सोमवारी चिनी दूतावासाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## राम मंदिरापाठोपाठ आता बद्रीनाथ-केदारनाथ मंदिर समितीवरही भ्रष्टाचाराचे आरोप

● **डेहराडून –**
अयोध्येतील राम मंदिरातील कथित देणगी गैरव्यवहाराचा वाद सुरू असतानाच आता बद्री-केदार मंदिर समितीवरही आर्थिक गैरव्यवहाराचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. सामाजिक कार्यकर्ते आणि वरिष्ठ वकील विकेश सिंह नेगी यांनी माहितीच्या अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रांच्या आधारे काही धक्कादायक दावे केले आहेत.

नेगी यांच्या म्हणण्यानुसार, मंदिर समितीतील काही सदस्यांनी प्रवास भत्ता आणि दैनिक भत्त्याच्या नावाखाली एका वर्षापेक्षाही कमी कालावधीत लाखो रुपये घेतले. त्यांनी हा निधी भाविकांनी दिलेल्या देणग्यांमधून खर्च झाल्याचा आरोप करत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

नेगी यांनी सांगितले की, मंदिर कायद्यानुसार समितीच्या अधिकृत कामासाठी किंवा बैठकीसाठी प्रवास केला तरच सदस्यांना भत्ता मिळू शकतो. त्यानुसार सदस्यांना आमदारांप्रमाणे दररोज ६ हजार रुपये दैनिक भत्ता आणि प्रति किलोमीटर ४ रुपये प्रवास भत्ता देण्याची तरतूद आहे. मात्र, त्यांनी दावा केला की सध्याच्या समितीची नियुक्ती झाल्यानंतर केवळ एकच अधिकृत बैठक झाली होती. तरीही काही सदस्यांनी आठ महिन्यांत मोठ्या प्रमाणात भत्ते घेतल्याचे आरटीआयमधून समोर आले आहे.

नेगी यांनी आरोप केला की, काही सदस्यांनी विविध धार्मिक कार्यक्रम आणि वैयक्तिक दौरे हे अधिकृत कार्यक्रम असल्याचे दाखवून भत्ते घेतले. त्यांच्या म्हणण्यानुसार, वसंत पंचमीनिमित्त नरेंद्रनगर येथे झालेल्या बद्रीनाथ मंदिराचे कपाट उघडण्याच्या तारखेच्या कार्यक्रमालाही काही सदस्यांनी अधिकृत कार्यक्रम म्हणून दाखवून पैसे घेतले. प्रत्यक्षात हा कार्यक्रम टिहरी राजघराण्याच्या परंपरेनुसार आयोजित केला जातो, असा दावा त्यांनी केला. तसेच, केदारनाथ आणि इतर धामांच्या दौऱ्यांसाठी हेलिकॉप्टरचा खर्चही मंदिराच्या निधीतून करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

# 'वृद्धेश्वर'च्या निवडणुकीत आदिनाथ शेतकरी मंडळाचा विजय

## दोन जागेसाठी झाले होते मतदान । आ. मोनिकाताई राजळेंचे निर्विवाद वर्चस्व कायम

● **पाथर्डी । वीरभूमी –**
तालुक्याची कामधेनू म्हणुन ओळख असलेल्या वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना पंचवार्षिक संचालक मंडळाच्या कासार पिंपळगाव गटाच्या दोन जागेसाठी झालेल्या निवडणुकीत आदिनाथ शेतकरी मंडळाने विजय मिळवला आहे. या अगोदर १७ जागा बिनविरोध झाल्या होत्या. यामुळे आ. राजळे यांच्या आदिनाथ शेतकरी मंडळाने सर्वच्या सर्व १९ जागांवर निर्विवाद वर्चस्व मिळवत एकहाती सत्ता मिळवली आहे.

ऊस उत्पादक मतदारसंघातील कासार पिंपळगाव गटाच्या दोन जागेसाठी तीन उमेदवारी अर्ज राहिल्याने येथे शुक्रवारी मतदान झाले होते. ८७०८ सभासद मतदारांपैकी ५६८० मतदारांनी आपला हक्क बजावला होता. कासार पिंपळगाव गटातून सत्ताधारी आदिनाथ शेतकरी मंडळाकडून आप्पासाहेब राजळे व उद्धव वाघ हे तर विरोधी गटाकडून शिवशंकर राजळे हे निवडणुकीच्या रिंगणात होते. दोन जागेसाठी शुक्रवारी मतदान होवून आज शनिवारी सकाळी पाथर्डी तहसील कार्यालयात मतमोजणी पार पडली.

यामध्ये आदिनाथ शेतकरी मंडळाचे उमेदवार आप्पासाहेब राजळे यांना ४९३२ व उद्धव वाघ



यांना ४१५८ ईतके मते पडून विजयी झाले. तर विरोधी शिवशंकर राजळे यांना १६४२ मतांवर समाधान मानावे लागले. बॅलेटपेपर वर मतदान झाल्याने एकुण ६७ मते बाद ठरली. मतमोजणीचा निकाल लागल्यानंतर राजळे समर्थकांनी गुलालाची उधळण करत एकच जल्लोष केला.

सकाळी तहसील कार्यालयात मतमोजणीला सुरुवात झाली. सत्ताधारी गटाच्या दोन्ही उमेदवारांनी पहिल्या फेरीपासून घेतलेली आघाडी शेवटपर्यंत कायम राहिली. मतदान केंद्रात राहुल राजळे, विरोधी उमेदवार शिवशंकर राजळे, योगिता राजळे हे ठाण मांडून होते.

यापुर्वीच सत्ताधारी आ. मोनिका राजळे गटाने १७ जागा बिनविरोध मिळवल्या होत्या. आता उर्वरीत दोन जागांही भरघोस मतांनी जिंकल्याने सर्वच्या सर्व जागांवर निर्विवाद वर्चस्व मिळवून एकहाती सत्ता काम ठेवली आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणुन प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी काम पाहिले तर त्यांना तहसीलदार उद्धव नाईक यांनी सहाय्य केले.

**उमेदवारांना गटनिहाय पडलेली मते**

| बुथ क्रमांक व गटाचे नाव | आप्पासाहेब राजळे | शिवशंकर राजळे | उद्धवराव वाघ | बाद झालेली मते |
|---|---|---|---|---|
| १. कासार पिंपळगाव | ७०१ | २९२ | ५१८ | ९ |
| २. कासार पिंपळगाव | ४९७ | १५० | ४२८ | ९ |
| ३. चितळी | ६१८ | २१० | ५०४ | ५ |
| ४. चितळी | ४११ | १३६ | ३४५ | ५ |
| ५. कोरडगाव | ६९७ | २०५ | ६०५ | ११ |
| ६. पाथर्डी | ७६५ | २६५ | ६१८ | ४ |
| ७. मिरी | ६९१ | २०८ | ६३४ | ९ |
| ८. टाकळी मानूर | ५५२ | १७६ | ५०६ | १५ |
| **एकुण मते** | **४९३२** | **१६४२** | **४१५८** | **६७** |

SPOT NEWS

## राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त निमगाव वाघात मोफत नेत्र तपासणी

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
लोककल्याणकारी विचारांचे प्रणेते राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त निमगाव वाघा (ता. नगर) येथे स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि वैष्णवी ऑप्टिकल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा सहज उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरातून अनेक गरजू नागरिकांना लाभ घेतला. तसेच यावेळी संत सावता महाराज मंदिर परिसरात स्वच्छता अभियानही राबविण्यात आले. या उपक्रमाद्वारे सार्वजनिक स्वच्छतेचा संदेश देत सामाजिक जबाबदारीची जाणीव ग्रामस्थांमध्ये निर्माण करण्यात आली. शिबिराचे उद्घाटन ग्रामपंचायत सदस्य तथा स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते झाले. यावेळी लक्ष्मण चौरे, डॉ. वैष्णवी संजय जरबंडी, डॉ. ओमकेश सत्यनारायण कोंडा, दत्तात्रय फलके, जालिंदर शिंदे, अरुण काळे, तुकाराम फलके, छगन भगत, भाऊसाहेब ठाणगे, सावळेराम येवले, बबन जाधव, बाबा खळदकर, भाऊसाहेब आनंदकर, विठ्ठल शिंदे, रामदास जाधव, श्री नवनाथ युवा मंडळाचे अध्यक्ष पै. संदीप डोंगरे, अनिल आनंदकर यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## खडांबे येथील श्री शाहू विद्या मंदिरात राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, श्री शाहू विद्या मंदिर, खडांबे येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व दिमाखदार वातावरणात साजरी करण्यात आली. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले. यावेळी अशोकराव उंडे साहेब (उंडे नर्सरी संचालक), कृषिभूषण सुरसिंगराव पवार, बाळासाहेब लटके (माजी उपसभापती पंचायत समिती), यशवंत ताकटे (माजी सरपंच), श्यामराव खेसम्हाळसकर (माजी सरपंच), इंजि. मच्छिंद्र सोनवणे, बाळासाहेब जठार, अनशाबापू आवारे (ग्रामपंचायत सदस्य), भाऊसाहेब खळेकर (माजी मुख्याध्यापक), अर्जुनराव खळेकर (माजी उपसरपंच), केरू कल्हापुरे, गुलाबराव पवार, बाळासाहेब कल्हापुरे, भानुदास कल्हापुरे, दादा पाटील काचोळे, उपसरपंच अमोल हरिश्चंद्रे तसेच अनिल कल्हापुरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. विद्यालयाच्या वतीने सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनकार्य, सामाजिक सुधारणा आणि शैक्षणिक क्रांतीवर आधारित भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य आप्पासाहेब शिंदे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणाचे पुरस्कर्ते होते.

# २२ वर्षांपूर्वीच्या गुन्ह्यातील फरार आरोपी जेरबंद

## नाव बदलून पोलिसांना देत होता चकमा । श्रीगोंदा पोलिसांची कारवाई

**श्रीगोंदा । वीरभूमी –**
तब्बल २२ वर्षांपूर्वी दाखल झालेल्या जुन्या गुन्ह्यातील फरार आरोपीस श्रीगोंदा पोलिसांनी शिताफीने जेरबंद केले आहे. विशेष म्हणजे आरोपीने आपले नाव बदलून ओळख लपवत पोलिसांना दीर्घकाळ चकमा दिला होता.

अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांच्या विशेष फरार आरोपी शोध मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १५८/२००४ भादंवि कलम ३९४, ३४ अन्वये दाखल गुन्ह्यातील पाहिजे आरोपी महेश दरड्या पवार (वय ४५, रा. निमगाव खलू, ता. श्रीगोंदा) हा श्रीगोंदा परिसरात नाव बदलून राहत असल्याची गोपनीय माहिती पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांना मिळाली होती.

या माहितीची शहानिशा करण्याचे आदेश २६ जून रोजी देण्यात आले होते.




माहितीची खात्री झाल्यानंतर पोलिस पथकाने वेशांतर करून आरोपीला पकडण्यासाठी सापळा रचला. आज, २७ जून रोजी आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

चौकशीदरम्यान आरोपीने आपले मूळ नाव महेश दरड्या पवार असल्याची कबुली दिली. त्याच्या वडिलांच्या निधनानंतर आईने दरड्या पवार यांच्याशी दुसरा विवाह केल्याने तो महेश श्याम पवार या नावाने राहत होता. जुना गुन्हा महेश दरड्या पवार या नावाने दाखल असल्यामुळे ओळख लपवण्यासाठी त्याने नाव बदलल्याचे तपासात निष्पन्न झाले. खात्री झाल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबुर्मे, पोलीस उपाधीक्षक सुजीतकुमार क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

कारवाईत पोलीस उपनिरीक्षक मनोहर खिळदकर, पोलीस कॉन्स्टेबल आनंद मैड, वैजिनाथ कुटे, राहुल मोढळे, अरुण पवार, पळसे, काष्टी बीटचे पोहेकॉ. पांडुरंग भांडवलकर, पोहेकॉ. नितीन नरुटे, महिला पोलीस कॉन्स्टेबल गीतांजली लाड व चापोकॉ. शरद चोभे यांनी सहभाग घेतला.

## श्री वरद विनायक देवस्थानची 'रुग्ण उपयोगी साहित्य बँक' उपक्रम

**अकोले । वीरभूमी–**
धार्मिक व आध्यात्मिक कार्याबरोबरच सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या कोतुळ येथील प्रसिद्ध श्री वरद विनायक देवस्थानने ग्रामीण भागातील गरीब व गरजू रुग्णांसाठी 'रुग्ण उपयोगी साहित्य बँक' हा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, गणेशभक्त आणि देणगीदारांनी वैद्यकीय साहित्य तसेच आर्थिक स्वरूपात सहकार्य करावे, असे आवाहन देवस्थानने केले आहे.

गंभीर आजार किंवा अपघातानंतर अनेक रुग्णांना घरी उपचार सुरू ठेवण्यासाठी व्हीलचेअर, वॉकर, मेडिकल बेड, एअर बेड, कमोड चेअर आणि ऑक्सिजन मशीन यांसारख्या साहित्याची आवश्यकता भासते. मात्र, हे साहित्य महाग असल्याने ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना ते खरेदी करणे शक्य होत नाही. कोतुळ व परिसरातून अशा साहित्याची वाढती गरज लक्षात घेऊन देवस्थानने हे साहित्य गरजू रुग्णांना मोफत वापरण्यासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे.

या उपक्रमासाठी देवस्थानने तीन प्रकारे सहकार्याचे आवाहन केले आहे. घरात वापरात नसलेले पण सुस्थितीतील रुग्ण उपयोगी साहित्य दान करावे, नवीन साहित्य खरेदी करून देवस्थानला भेट द्यावे किंवा आर्थिक स्वरूपात देणगी द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

'मानव सेवा हीच बाप्पाची सेवा' या भावनेतून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष प्रदीप श्रीधर भाटे यांच्यासह विनय समुद्र, संभाजी पोखरकर, कुलदीप नेवासकर, विशाल बोन्हाडे, डॉ. कपिल कातोरे, सचिन पाटील, अनिल पाठक, सुभाष घाटकर आणि अजित आरोटे यांनी केले आहे.

## श्रीरामपूर कार्यशाळेचे कर्मचारी सुरेंद्र कसदेकर यांची अमरावतीला बदली; सहकाऱ्यांकडून भावपूर्ण सत्कार

**श्रीरामपूर । वीरभूमी–**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या श्रीरामपूर कार्यशाळेने गुणवत्तापूर्ण सेवा, तांत्रिक कौशल्य आणि कर्तव्यनिष्ठ कर्मचाऱ्यांच्या बळावर पुन्हा एकदा आपली वेगळी ओळख अधोरेखित केली आहे. कार्यशाळेच्या इंजिन विभागात कार्यरत असलेले कर्मचारी सुरेंद्र कसदेकर यांची अमरावती विभागात बदली झाल्याने त्यांच्या गौरवशाली सेवेला मानवंदना देत अधिकारी, कर्मचारी, महिला कर्मचारी, संघटनेचे पदाधिकारी आणि मित्रपरिवाराच्या वतीने त्यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला.

सुरेंद्र कसदेकर यांनी आपल्या सेवाकाळात प्रामाणिकपणा, शिस्त, जबाबदारी आणि उत्कृष्ट तांत्रिक कौशल्याच्या जोरावर कार्यक्षेत्रात वेगळी छाप पाडली. त्यांच्या कार्यतत्परतेमुळे श्रीरामपूर कार्यशाळेच्या कार्यक्षमतेत मोलाची भर पडली असून



सहकाऱ्यांमध्ये त्यांनी विश्वासार्ह आणि अभ्यासू कर्मचारी म्हणून विशेष स्थान निर्माण केले आहे.

सत्कारप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत अमरावती विभागातील सेवाप्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्यांच्या अनुभवाचा आणि तांत्रिक ज्ञानाचा लाभ अमरावती विभागालाही निश्चितच होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमास कार्यशाळेतील अधिकारी अविनाश आसने, कैलास साबळे, मिरीकर मॅडम, अण्णासाहेब दाभाडे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

संघटनेच्या वतीने सचिव संतोष ठोकळ, कार्याध्यक्ष प्रवीण सुडके, उपाध्यक्ष संतोष नाथ, मनोज खंडिझोड, बाबासाहेब गोलवड तसेच अन्य पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून श्री. कसदेकर यांना शुभेच्छा दिल्या. महिला कर्मचारी वर्गातून सहसचिव निशा ठोकळ, रूपाली चाटे, कांताबाई नानोर, सीमा घनसावंत यांच्यासह अनेक महिला कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित होत्या.

# शिर्डी विधानसभा मतदारसंघात ३० जूनपासून विशेष सखोल पुनरीक्षण

## मतदार केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
२१८ शिर्डी विधानसभा मतदारसंघात भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ३० जूनपासून विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमास प्रारंभ होणार आहे. या मोहिमेअंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी भेटी देणार असून नागरिकांनी त्यांना सर्वतोपरी सहकार्य करून हा कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन मतदान नोंदणी अधिकारी तथा प्रांताधिकारी माणिक आहेर यांनी केले आहे.

या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी २५ व २६ जून रोजी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांसाठी दोन दिवसीय विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. मतदान नोंदणी अधिकारी तथा प्रांताधिकारी माणिक आहेर व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार अमोल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण पार पडले. यादी भाग क्रमांकानुसार प्रशिक्षणाचे दोन स्वतंत्र सत्रांमध्ये आयोजन करण्यात आले. प्रत्यक्ष उदाहरणे, प्रपत्र हाताळणी तसेच क्षेत्रीय अडचणींवर चर्चा करून अधिकाऱ्यांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षणादरम्यान गणना प्रपत्रांचे घरपोच वितरण, त्यामध्ये अचूक व त्रुटीरहित माहिती भरण्याची पद्धत, पात्र मतदारांची माहिती संकलित करणे, पडताळणीची कार्यपद्धती, नवीन मतदार नोंदणी, नावातील दुरुस्ती, स्थलांतरित मतदारांची माहिती अद्ययावत करणे तसेच भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्तता याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

विशेष मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रम हा लोकशाही प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा घटक असून प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार सुनिश्चित करण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर १९ जून रोजी सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार अमोल मोरे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार एकही पात्र मतदार मतदार यादीतून वंचित राहू नये आणि कोणत्याही अपात्र व्यक्तीचा मतदार यादीत समावेश होऊ नये, यासाठी अचूक व त्रुटीरहित मतदार यादी तयार करण्याबाबत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना मार्गदर्शन करण्यात आले.



या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमासाठी १ ऑक्टोबर २०२६ हा अर्हता दिनांक निश्चित करण्यात आला आहे. २० ते २९ जून या कालावधीत पूर्वतयारी, प्रशिक्षण व आवश्यक साहित्य छपाईची कामे पूर्ण करण्यात आली असून ३० जून ते २९ जुलै या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी भेटी देऊन माहिती संकलित करणार आहेत. तसेच २९ जुलैपर्यंत मतदान केंद्रांच्या यादीचे सुसूत्रीकरण करण्यात येणार आहे.

५ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार याद्यांची प्रसिद्धी करण्यात येईल. त्यानंतर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारल्या जातील. प्राप्त दावे व हरकतींचे निवारण ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर या कालावधीत करण्यात येईल. त्यानंतर ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार याद्यांची प्रसिद्धी करण्यात येणार आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## युवा अकॅडमी व राही फाउंडेशनच्यावतीने छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

लोककल्याणकारी समाजाची पायाभरणी करून समाजसुधारणेचे प्रेरणादायी कार्य छत्रपती शाहू महाराजांनी केले. त्यांनी आंतरजातीय आणि विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता देणारे कायदे केले. शिक्षणाशिवाय समाजाचा उद्धार होणार नाही, हे जाणून त्यांनी कोल्हापुरात मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. विविध जाती धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह सुरू केली. शेती, उद्योग, व्यवसाय, शिक्षण, सामाजिक सुधारणा, आरक्षण आदींवर अतिशय प्रभावी कार्य केल्याचे प्रतिपादन ॲड. महेश शिंदे यांनी केले. जय युवा अकॅडमी व राही फाउंडेशन यांच्या वतीने कोल्हेवाडी येथे छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त ग्रामीण भागातील महिलांना आरोग्य विषयक आणि शिवणकामाचे घरबसल्या कामाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी ॲड. शिंदे बोलत होते. यावेळी राही फाउंडेशनच्या संचालिका रूपाली करांडे, निलेश गर्जे, जय युवा अकॅडमीचे ॲड. दिनेश शिंदे, ॲड. मनीषा भिंगारदिवे, वनिता पाडळे, कविता अभंग, राम अभंग, उडान फाउंडेशनच्या आरती शिंदे, शिवगामीनी संस्थेच्या ॲड. गायत्री गुंड, ॲड. विद्या शिंदे, मानवता सेवा संघाच्या हेमलता कांबळे, जयश्री शिंदे, आशा वर्कर अनिता पाटोळे आदी उपस्थित होते. प्रारंभी रूपाली करांडे यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. हेमलता कांबळे यांनी महिलांना आरोग्याबाबत जागृत राहून आयुर्वेदिक सॅनिटरी नॅपकिन वापरले पाहिजे. केमिकलमुक्त पॅड वापरणे गरजेचे असून, बाजारातील केमिकल युक्त पॅड मधून विविध आजारांना महिला व युवती बळी पडत आहे. त्यासाठी प्लास्टिक केमिकल विहिरीत आयुर्वेदिक सॅनिटरी पॅड वापरावे असे आवाहन करून उपस्थित महिलांना प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेश शिंदे यांनी केले. आभार अनिता पाटोळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीकरण्यासाठी कुसुम वनकर, विमल ढगे, वृषाली कराळे, रेखा दुसुंगे, संगीता बनकर यांनी परिश्रम घेतले.

## ज्ञानरचना सोशल फाउंडेशनकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वाटप

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत अधिकार असून आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण खंडित होऊ नये, या सामाजिक बांधिलकीतून कार्यरत असलेल्या ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या वतीने पारनेर तालुक्यातील लोणी मावळा येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयातील विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी आवश्यक शैक्षणिक किटचे वितरण करण्यात आले. या उपक्रमांतर्गत तीस विद्यार्थ्यांना वह्या, दप्तर, कंपास बॉक्स तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्य फाउंडेशनच्या सुनंदा गौतम मावळे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी संचालक प्रविण साळवे, भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष नानाभाऊ मावळे, सचिव नवनाथ शेंडकर, मुख्याध्यापक मच्छिंद्र राऊत, विकास शेंडकर, बाबासाहेब दौंड, संतोष झरेकर, बाबाजी मावळे, बाळासाहेब मापारी, हरिभाऊ जाधव, रघुनाथ पवार, सौ. गुंड, अमृता लोंढे, आदिनाथ वाघ, विजय लाळगे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'युवा शक्ती जागर' यात्रेतून राज्य नशामुक्तीचा संदेश द्या

### ना. राधाकृष्ण विखे पाटील | शिर्डीत भाजयुमोच्या 'युवा शक्ती जागर' यात्रेचे स्वागत

**● शिर्डी । वीरभूमी –**

अमली पदार्थ मुक्त देश करण्यासाठी सुरू झालेल्या मोहीमेत भाजयुमोने सुध्दा पुढाकार घ्यावा. केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी संपूर्ण देशभर यासाठी मोहीम सुरू केली आहे.राज्यातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत कडक धोरण घेतले असून, युवा शक्ती जागर यात्रेतून भाजयुमोने राज्य नशामुक्त करण्याचा संदेश युवकांमध्ये पोहचविण्याचे आवाहन जलसंपदा तथा पालक मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.



भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णकांत महाडीक यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आलेल्या युवा शक्ती जागर यात्रेचे शुक्रवारी शिर्डीत आगमन झाले.यानिमित्ताने आयोजित केलेल्या युवा मोर्चाच्या मेळाव्यात मंत्री विखे पाटील यांनी युवक कार्यकर्त्यांशी संवाद साधला.भाजपाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर,सरचिटणीस अशोक पवार भाजपयुमोचे उतर जिल्ह्याचे अध्यक्ष रोहीत चौधरी,नगराध्यक्षा सौ. जयश्री थोरात,उपनगराध्यक्ष अभय शेळके,भाजपाचे शहर अध्यक्ष रविंद्र गोंदकर,यांच्यासह उतर अहील्यानगर जिल्ह्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी संपूर्ण देश नक्षलमुक्त करून दाखवला.आता अंमली पदार्थ मुक्त देश करण्यासाठी त्यांनी धडक मोहीम सुरू केली आहे. देशाच्या सामाजिक व्यवस्थेला अमली पदार्थांचे रॅकेट उध्वस्त करीत आहेत. याविरोधातील मोहीम यशस्वी करायची असेल तर, सर्वाच्या प्रयत्नांची गरज असल्याचे सांगून मंत्री विखे पाटील म्हणाले की, युवकांमध्ये जावून यासाठी प्रबोधन करावे लागेल. युवा मोर्चाच्या माध्यमातून यासाठी प्रयत्न व्हावेत आशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आज देश एक परीवर्तनाच्या काळातून जात आहे. तरुणांचा देश म्हणून जगात भारताची ओळख आहे. त्यामुळेच देशातील युवा शक्तीला पुढे घेवून जाण्याचा यशस्वी प्रयत्न सुरू असून, देशाची युवा शक्ती म्हणजे बौध्दीक आणि उर्जासंपन्न शक्ती असल्याचे सांगून, मागील बारा वर्षात सर्वाधिक स्टार्ट अप, मेक इन इंडीया आणि डिजिटल इंडियाच्या प्रक्रीयेत युवा शक्तीला मोठे स्थान मिळाले असल्याकडे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

आज राज्यात मोठ्या प्रमाणात उद्योगाची गुंतवणुक येत आहे.याचा उपयोग युवकांनाच होणार आहे. अहिल्यानगर जिल्हा सुध्दा डिफेन्स उद्योगाचे मोठे केंद्र बनत आहे. आत्मनिर्भर भारत योजनेतून सुरू असलेली उद्योगाची उभारणी ही देशातील युवाशक्तीचे बलस्थान असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

केंद्र आणि राज्य सरकारचे निर्णय जनतेपर्यत घेवून जाण्याची मोठी जबाबदारी भाजयुमोवर आहे. सरकारचे काम समाजात सांगण्यास आपण कमी पडतो म्हणूनच काही शक्ती डोके वर काढून युवकांमध्ये वातावरण कलुषित करण्याचा प्रयत्न करतात.पण आशा प्रवृतीना जनाधार नसतो.

भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष कृष्णकांत महाडीक यांनी आपल्या भाषणात यात्रेमागील उद्देश विषद करताना सांगितले की, तरुणांना राष्ट्रीय विचारांच्या प्रवाहात आणताना राज्याच्या सांस्कृतिक अध्यात्मिक परंपरांची माहीती करून देण्याचा प्रयत्न आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून सुरू असलेल्या विकास प्रक्रीयेची माहीती युवकांपर्यत पोहचविण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष रोहीत चौधरी यांनी केले.

## कोतूळ उपकेंद्रात सहाय्यक अभियंता पद रिक्त असल्याने अनागोंदी कारभार

**● अकोले । वीरभूमी–**

महावितरणच्या ३३/११ केव्ही कोतूळ उपकेंद्रातील सहाय्यक अभियंता हे महत्त्वाचे पद दीर्घकाळापासून रिक्त असल्याने ग्राहक व शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या रिक्त पदामुळे उपकेंद्राचा कारभार अतिरिक्त कार्यभारावर सुरू असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश चिटणीस हेमंत देशमुख यांनी याविरोधात तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

सध्या कोतूळ उपकेंद्राचा अतिरिक्त कार्यभार ब्राह्मणवाडा येथील कक्ष अभियंत्याकडे आहे. मात्र, ते आठवड्यातून केवळ एकदाच कोतूळ येथे येत असल्याने ग्राहकांची कामे प्रलंबित राहत आहेत. कायमस्वरूपी अधिकारी नसल्याने वीजपुरवठा वारंवार खंडित होणे, मीटर रीडिंगमधील चुका आणि चुकीची वीजबिले अशा समस्यांमध्ये वाढ झाली आहे. बिल दुरुस्तीसाठी नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याची तक्रार आहे.

याशिवाय, कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याने आपत्कालीन परिस्थितीत ग्राहकांना संपर्कासाठी कोणीच उपलब्ध नसल्याची परिस्थिती आहे. या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कोहने सबस्टेशनचाही समावेश असल्याने कामाचा ताण आणखी वाढला आहे.

कोतूळ उपकेंद्राची क्षमता १५ एमव्हीए असून, त्यावर ६ हजार १४० घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहक, ४० पाणीपुरवठा योजना आणि २ हजार ४०० शेती पंप अवलंबून आहेत. येथे ११ केव्हीचे सात फीडर (पाच कृषी व दोन गावठाण) कार्यरत असून, आणखी पाच फीडरचे काम सुरू आहे. तसेच ३३ केव्हीचा एक आउटगोइंग फीडरही कार्यरत आहे. एवढा मोठा कारभार अतिरिक्त कार्यभारावर चालविणे अशक्य असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## आ. मोनिकाताई राजळे यांनी मंजूर केलेल्या 'नमो उद्यान' निधीचे श्रेय घेण्यासाठी विरोधकांचा खटाटोप

### नगरसेवक गणेश कोरडे | २०२५ मध्येच निधी मंजूर झाल्याचे स्पष्टीकरण

**● शेवगाव । वीरभूमी–**

आमदार मोनिकाताई राजळे यांच्या विशेष प्रयत्नातून शेवगाव शहरात 'नमो उद्याना'साठी भरीव असा निधी मागील वर्षीच मंजूर झालेला आहे. आमदार मोनिकाताई राजळे यांनी मंजूर केलेल्या कामांचे श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न विरोधकांकडून केला जात आहे. शहरातील नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न यशस्वी होणार नाही, अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक गणेश कोरडे यांनी दिली आहे.



सविस्तर वृत कि, आ. मोनिकाताई राजळे यांच्या विशेष प्रयत्नातून शेवगाव शहरात 'नमो उद्यान' उभारणीसाठी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडून वैशिष्टयपूर्ण योजनेअंतर्गत शेवगांव नगरपरिषदेसाठी १ कोटी रुपये व पाथर्डी नगरपरिषदेसाठी १ कोटी रुपये असा एकुण २ कोटी रुपयांचा निधी शेवगाव- पाथर्डी मतदार संघासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करुन दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या वतीने मान्यता मिळाली. मात्र जाणीव पूर्वक नागरिकांची दिशाभुल करण्याकरिता विरोधक हा निधी आपण मंजूर केल्याचा दावा करत असुन वास्तविक पहाता नगरपरिषद निवडणुका पूर्वीच आमदार मोनिकाताई राजळे यांनी हा निधी मंजूर करून घेतलेला आहे. जुन्या मंजुर कामांनाच हि काम आम्ही मंजुर केल्याची टिमकी मिरवण्याचा विरोधकाचा प्रयत्न असला तरी त्यांचा हा प्रयत्न निष्फळ ठरेल, अशी माहिती भाजपाचे नगरसेवक गणेश कोरडे यांनी दिली आहे.

या 'नमो उद्याना'चे श्रेय फक्त आ. मोनिकाताई राजळे यांचेच असुन फुकटचे श्रेय घेण्याचा खटाटोप विरोधकांनी आता थांबवावा. स्वतःच्या पाठपुराव्यातून नवीन विकासकामे मंजूर करून त्यांचे श्रेय घ्यावे. आयत्या पिठावर रेघोट्या मारण्याचा हा प्रकार जनतेच्या लक्षात आला असून नागरिक याबाबत जागरुक आहेत, असेही गणेश कोरडे यांनी म्हटले आहे.

# सरस्वती मंदिर नाईट स्कूलच्या विद्यार्थ्यांना वह्या व पुस्तकांचे वाटप

### कष्टकरी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ | रात्रशाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणाची नवी उमेदला हातभार

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

दिवसभर विविध व्यवसाय, दुकाने, हॉटेल्स आणि इतर ठिकाणी काम करून आपल्या कुटुंबाची जबाबदारी सांभाळणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत गेल्या सहा दशकांपासून समाजात वेगळा आदर्श निर्माण करणाऱ्या नवविद्या प्रसारक मंडळाच्या सरस्वती मंदिर नाईट स्कूलमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वह्या व पुस्तकांचे वितरण करण्यात आले. याचवेळी इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांच्या यशाचे कौतुक करण्यात आले.

या कार्यक्रमात नवविद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त मंगेश धर्माधिकारी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. उपस्थित विद्यार्थ्यांना शाळेतील विविध सुविधा, शिक्षकांचा परिचय आणि आगामी शैक्षणिक वर्षासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मुख्याध्यापक पांडुरंग गवळी यांनी रात्रशाळेच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की, अनेक विद्यार्थी कौटुंबिक आर्थिक परिस्थितीमुळे दिवसा नियमित शाळेत शिक्षण घेऊ शकत नाहीत. अशा होतकरू आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी रात्रशाळा ही शिक्षणाची दुसरी संधी ठरते. विविध सामाजिक संस्था, दानशूर व्यक्ती आणि शिक्षणप्रेमींच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके आणि इतर शैक्षणिक साहित्याची मदत केली जाते. त्यामुळे आर्थिक अडचणीमुळे कोणाच्याही शिक्षणात खंड पडू नये, यासाठी शाळा सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले.

मंगेश धर्माधिकारी म्हणाले की, शिक्षण हीच जीवनातील सर्वात मोठी संपत्ती आहे. विद्यार्थ्यांनी गुरूजनांचा आदर ठेवून प्रामाणिकपणे ज्ञानार्जन करावे. दिवसभर कष्ट करून रात्री शिक्षण घेणारे विद्यार्थी मोठ्या जिद्दीने आपले भविष्य घडवत आहेत. कापड दुकाने, हॉटेल्स तसेच विविध व्यवसायांमध्ये काम करूनही अभ्यासात चांगले यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे त्यांनी विशेष कौतुक केले. जबाबदाऱ्या सांभाळत शिक्षण घेण्याची विद्यार्थ्यांची चिकाटी समाजासाठी प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात शैक्षणिक गुणवत्तेचा गौरव करत इयत्ता दहावीमध्ये ६७.८३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या सौ. मुक्ता ताकटे, ६० टक्के गुणांसह द्वितीय आलेल्या सौ. ताई जगधने तसेच तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या सौ. उज्वला नेटके यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले. याचवेळी इयत्ता आठवी, नववी आणि दहावीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके आणि आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना शाळेतील शैक्षणिक वातावरण, शिक्षकांची कार्यपद्धती आणि उपलब्ध सुविधांची



माहिती देण्यात आली, जेणेकरून त्यांच्या शिक्षणाचा प्रवास अधिक सुलभ होईल.

कार्यक्रमास माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष उत्तम खैरे यांची प्रमुख उपस्थिती होती. नवविद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर, सचिव निलेश वैकर, शाळा समितीचे अध्यक्ष डॉ. गीते तसेच सर्व विश्वस्तांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास शिंदे यांनी केले, तर देवका लबडे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विना कुऱ्हाडे, सुषमा धारूरकर, राजू भुजबळ आणि महेंद्र म्हसे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कोथूळ मल्हारगड डोंगरावरील महादेव मंदिराचा ऐतिहासिक शिलालेख आढळला

## मराठा उत्तरकालीन ग्रामीण प्रशासन व समाजजीवनाचा महत्त्वपूर्ण पुरावा

**■ विजय उंडे**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –** तालुक्यातील मौजे कोथूळ येथील गावापासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर डोंगरमाथ्यावर प्रसिद्ध मल्हारगड व खंडोबा मंदिर परिसर आहे. या मंदिराच्या मागील बाजूस असलेल्या एका लहान शिवमंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या वर मध्यभागी एक महत्त्वपूर्ण शिलालेख कोरलेला आढळतो. हा शिलालेख मराठा उत्तरकालीन इतिहास, ग्रामीण प्रशासन आणि स्थानिक समाजजीवनाचा अभ्यास करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो.

हा शिलालेख उठाव स्वरूपातील असून चार ओळींचा आहे. तो देवनागरी लिपीत मराठी भाषेत कोरलेला आहे. अनेक वर्षे उघड्यावर असल्यामुळे वातावरणाचा परिणाम शिलालेखावर झालेला दिसून येतो. काही अक्षरे झिजलेली असून काही पुसट झाली आहेत. तसेच वारंवार झालेल्या रंगरंगोटीमुळे अनेक अक्षरे बुजून गेली होती. मात्र रंग काढून शिलालेखाचा छाप घेतल्यानंतर अथक प्रयत्नांतून त्यावरील मजकूर वाचण्यात यश आले.

**शिलालेखाचे वाचन**

**१. नरसो वीश्वनाथजी त्रिंब(क)**
**२. कुळकर्णी मौजे कोथुळ सके**
**३. १६६६ रक्ताशी नाम**
**४. सवछरे**

शिलालेखाचा अर्थ : श्री शिव चरणी तत्पर असा भक्तिभाव व्यक्त करणारे मौजे कोथूळ येथील नरसो विश्वनाथजी त्रिंबक कुळकर्णी यांनी शालिवाहन शक १६६६, रक्ताक्षी नाम संवत्सर, म्हणजेच इ.स. १७४४ च्या सुमारास हे महादेव मंदिर बांधून पूर्ण केले.

हा शिलालेख शालिवाहन शक १६६६ अर्थात इ.स. १७४४ च्या आसपासच्या कालखंडातील असून मराठा उत्तरकालीन ग्रामीण प्रशासन आणि समाजव्यवस्थेचा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक पुरावा मानला जातो.



शिलालेखात नरसो विश्वनाथजी त्रिंबक यांचा उल्लेख असून ते मौजे कोथूळ येथील कुळकर्णी असल्याचे स्पष्ट होते. मराठा काळात कुळकर्णी हे गावपातळीवरील अत्यंत महत्त्वाचे प्रशासकीय अधिकारी मानले जात. गावातील जमिनींच्या नोंदी, महसूल हिशोब, शेतसारा, वतन व्यवस्था तसेच सरकारी व्यवहारांची लेखी नोंद ठेवण्याची जबाबदारी त्यांच्याकडे असे. त्यामुळे या शिलालेखातून अठराव्या शतकात कोथूळ येथे सक्षम स्थानिक प्रशासन व्यवस्था अस्तित्वात होती, हे अधोरेखित होते.

मौजे कोथूळ या उल्लेखामुळे त्या गावाच्या ऐतिहासिक अस्तित्वाचा तसेच तेथील सामाजिक आणि प्रशासकीय रचनेचा पुरावा मिळतो. रक्ताक्षी नाम संवत्सरे या कालोल्लेखातून भारतीय पारंपरिक कालगणना पद्धतीचा वापर त्या काळातील लेखनात होत असल्याचे स्पष्ट होते.



> हा शिलालेख केवळ एका व्यक्तीची नोंद नसून मराठा काळातील गावव्यवस्था, महसूल प्रशासन, वतन पद्धती आणि स्थानिक समाजजीवन यांचे दर्शन घडविणारा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक दस्तऐवज आहे. स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठी अशा शिलालेखांचे स्थान अत्यंत मोलाचे आहे.
>
> **– अनिल दुधाणे,**
> शिलालेख वाचक, पुणे

या शिलालेखातील नरसो विश्वनाथजी त्रिंबक यांचे नाव त्या काळातील स्थानिक प्रतिष्ठित अधिकारी वर्गाचे प्रतिनिधित्व करते. अशा शिलालेखांमधून तत्कालीन गावव्यवस्था, अधिकारी वर्ग, त्यांची पदे, सामाजिक स्थान आणि ग्रामीण जीवन यांचा अभ्यास करण्यास महत्त्वपूर्ण मदत मिळते.

मल्हारगड डोंगर परिसरात खंडोबाचे मंदिर, अज्ञात वीरांच्या समाध्या, व्याघ्रगळ, दगडी रांजण तसेच इतर अनेक पुरातन अवशेष आढळून येतात. त्यामुळे हा परिसर ऐतिहासिक आणि पुरातत्त्वीय दृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो.

या शिलालेखाचे संशोधन राजेश इंगळे यांनी केले असून शिलालेखाचे वाचन पुणे येथील अनिल दुधाणे यांनी केले आहे. माहिती व संकलन अनिल दुधाणे यांचे आहे. तसेच शिलालेखाचा शोध, छाप व छायाचित्रे घेण्यासाठी शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन संचलित शिवदुर्ग वारसा संवर्धन समितीच्या वतीने मारुती वागस्कर, सचिन भोसले, सोमेश शिंदे तसेच स्थानिक नागरिकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# महामार्गांवरील फलकांवर ‘अहिल्यानगर’ व ‘छत्रपती संभाजीनगर’ नावे त्वरित लावावीत; हिंदु जनजागृती समितीचे निवेदन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–** महामार्गांवरील दिशादर्शक व अंतर दर्शविणाऱ्या फलकांवर अद्यापही जुनी नावे वापरली जात असल्याने ती तातडीने बदलून ‘अहिल्यानगर’ व ‘छत्रपती संभाजीनगर’ ही अधिकृत नावे दर्शविण्यात यावीत, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना देण्यात आले.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ‘अहमदनगर’चे ‘अहिल्यानगर’ आणि ‘औरंगाबाद’चे ‘छत्रपती संभाजीनगर’ असे नामकरण होऊन बराच कालावधी लोटला आहे. मात्र, विविध राष्ट्रीय व राज्य महामार्गांवरील अनेक दिशादर्शक फलकांवर अजूनही जुन्याच नावांचा उल्लेख दिसून येतो. त्यामुळे प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण होत असून अधिकृत शासकीय निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी झालेली दिसत नाही.

या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर व छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या सर्व महामार्गांवरील तसेच शहरांच्या हद्दीतील जुने फलक बदलून नव्या नावांचे फलक तातडीने लावावेत, अशी मागणी करण्यात आली. तसेच प्रशासनाने येत्या सात दिवसांत याबाबत कार्यवाही सुरू न केल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांनी निवेदन स्वीकारून यासंदर्भात सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन दिले.

यावेळी हिंदु जनजागृती समितीचे रामेश्वर भुकन, जिल्हा हिंदु संघटक बापू ठाणगे, हिंदुत्वनिष्ठ श्री संजय जोशी,श्री दिगंबर गेंट्याल,चैतन्य शेकडे तसेच विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# चापडगाव विद्यालयाचे क्रीडा शिक्षक सादिक शेख राष्ट्रीय खो-खो पंच परीक्षा उत्तीर्ण

**● शेवगाव । वीरभूमी–** आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या चापडगाव विद्यालयाचे क्रीडा शिक्षक सादिक शेख यांनी अखिल भारतीय खो–खो संघटनेच्या राष्ट्रीय खो–खो पंच परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली आहे. विशेष म्हणजे, यावर्षी अहिल्यानगर जिल्ह्यातून ही परीक्षा उत्तीर्ण होणारे ते एकमेव पंच ठरले आहेत.



सादिक शेख हे शेवगाव स्पोर्ट्स क्लबचे राष्ट्रीय खो–खो खेळाडू असून, गेल्या अनेक वर्षांपासून स्वतः खेळाडू म्हणून योगदान देतानाच विद्यालयातील खो–खोपटूंना प्रशिक्षण देत आहेत. तसेच विविध शालेय राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये पंच म्हणूनही त्यांनी जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे.

या यशासाठी त्यांना अरुण वावरे, निलेश झिरपे, किरण वाघ, सचिन वाल्हेकर आणि सचिन तहकीक यांचे मार्गदर्शन लाभले. राज्य खो–खो संघटनेचे महासचिव डॉ. चंद्रजीत जाधव यांनीही त्यांचे विशेष अभिनंदन केले.

त्यांच्या या यशाबद्दल आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ड. डॉ. विद्याधर काकडे, जिल्हा परिषद सदस्या हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्राचार्य डॉ. लक्ष्मण बिटाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंह काकडे, शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, सहप्रमुख अशोक आहेर, कांतेश्वर ढोले, विद्यालयाचे प्राचार्य संपत दसपुते, उपमुख्याध्यापक सुनील जायभाये, पर्यवेक्षक संजय दुधाडे तसेच प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# अर्थ आधार शक्ती फेडरल बचत गटाचा मेळावा उत्साहात

## ‘अर्थविश्व’ मार्गदर्शक पुस्तकाचे प्रकाशन । आर्थिक सक्षमीकरणासाठी बचत गट चळवळीला नवी दिशा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–** आर्थिक सक्षमीकरण, आर्थिक स्वावलंबन आणि समाजामध्ये बचतीची सुदृढ संस्कृती रुजविण्याच्या उद्देशाने अर्थ आधार शक्ती फेडरल बचत गटाच्या वतीने आयोजित बचत गटाचा मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या मेळाव्यात बचत गटाच्या सर्वांगीण विकासाला दिशा देणाऱ्या ‘अर्थविश्व’ या मार्गदर्शक पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

अर्थ आधार शक्ती फेडरल बचत गटाचे प्रथम सदस्य मोहनराव नागवडे यांच्या हस्ते ‘अर्थविश्व’ या मार्गदर्शक पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. बचत गटाचे अध्यक्ष विजय गाडळकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास सचिव मेजर शिवाजी वेताळ, पंडितराव हराळ गुरुजी, प्राचार्य खासेराव शितोळे, प्रा. भगवान काटे, डॉ. रमेश वाघमारे, राजेंद्र गुंड, सुधाकर बोरुडे, सुरेश ढवळे, परशुराम कोतकर, राजाराम रोहोकले, आंधळे, ॲड. महेश शिंदे, संतोष आंबेकर, दत्ता वामन, चिंतामणी, कासार, पर्वतराव हराळ, नामदेव गुंड, ताराचंद भणगे, मेजर शिंदे, परमेश्वर पाटील, सौ. सूर्यवंशी, परविन शेख, अश्विनी कातकडे यांच्यासह बचत गटाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात आंधळे यांनी बचत गटाच्या स्थापनेमागील उद्दिष्ट स्पष्ट करताना सांगितले की, सर्वांच्या श्रीमंतीत आपली श्रीमंती आणि आपल्या श्रीमंतीतून सर्वांची श्रीमंती या विचारधारेवर हा बचत गट कार्यरत आहे. आर्थिक शोषणमुक्त, स्वावलंबी आणि कल्याणकारी समाजव्यवस्था उभारण्याचा ध्यास घेऊन गटाने गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने कार्य केले आहे. सदस्यांमध्ये आर्थिक साक्षरता, पारदर्शक व्यवहार, शिस्त, आत्मविश्वास आणि स्वयंप्रेरणा निर्माण करून त्यांचे शाश्वत आर्थिक कल्याण साधण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्राचार्य खासेराव शितोळे म्हणाले की, आजच्या स्पर्धात्मक आणि वेगवान जीवनात आर्थिक नियोजन हे प्रत्येक व्यक्तीसाठी अत्यावश्यक झाले आहे. उत्पन्न किती आहे यापेक्षा त्याचे योग्य व्यवस्थापन कसे केले जाते, यावर व्यक्तीचे भविष्य अवलंबून आहे. यासाठी बचत गट चळवळ सर्वोत्तम ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. पंडितराव हराळ गुरुजी यांनी बचत गट ही केवळ पैशांची देवाणघेवाण करणारी संस्था नसून ती सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे. अर्थविश्व’ हे पुस्तक प्रत्येक सदस्याला आर्थिक शिस्त, बचत, गुंतवणूक आणि स्वावलंबनाचा मार्ग दाखवेल. शिक्षणाप्रमाणेच आर्थिक साक्षरतेचीही गरज आज प्रत्येक कुटुंबाला असल्याचे सांगितले.

प्रा. भगवान काटे म्हणाले की, स्वावलंबी समाजाची पायाभरणी बचतीपासून सुरू होते. नियमित बचत, योग्य गुंतवणूक आणि नियोजनबद्ध आर्थिक व्यवहार ही प्रत्येक कुटुंबाची ताकद आहे. अर्थ आधार शक्ती फेडरल बचत गटाने अल्पावधीत



केलेली प्रगती ही त्यांच्या पारदर्शक कार्यपद्धतीची साक्ष आहे. प्रकाशित झालेले ‘अर्थविश्व’ हे पुस्तक केवळ नियमावली नसून आर्थिक प्रगतीचा रोडमॅप आहे. विशेषतः युवक, महिला आणि शेतकरी यांच्यासाठी हे पुस्तक प्रेरणादायी ठरेल. संघटित बचत आणि परस्पर सहकार्याच्या बळावर आर्थिक क्रांती घडवून आणता येते, हे या संस्थेने सिद्ध केले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी प्रकाशित करण्यात आलेले ‘अर्थविश्व’ हे मार्गदर्शक पुस्तक बचत गटांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून त्यामध्ये आर्थिक सक्षमीकरण, बचतीचे महत्त्व, आर्थिक नियोजन, गुंतवणूक, कर्ज व्यवस्थापन, संघटनात्मक शिस्त आणि सदस्यांच्या सर्वांगीण विकासाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. या पुस्तिकेमध्ये सदस्यत्व प्रक्रिया, संघटन रचना, कार्यपद्धती, कर्ज वितरण, परतफेड व्यवस्था, विशेष योजना, नफा वितरण प्रणाली तसेच सदस्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती समाविष्ट करण्यात आली आहे. कृषी, उद्योग, व्यवसाय, शिक्षण, आरोग्य आणि सेवा क्षेत्रात सदस्यांचा सक्रिय सहभाग वाढवून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे उद्दिष्ट गटाने निश्चित केले आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेजर शिवाजी वेताळ यांनी केले, तर राजेंद्र गुंड यांनी आभार मानले.